*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIII / Issue – III* *ISSN 2277-8063*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अर्थनिती

**प्रिं.डॉ.शिवलिंग मेनकुदळे** सहसचिव, (उच्च शिक्षण) रयत शिक्षण संस्था, सतारा

---

**प्रस्तावना -**

विवेकपूर्ण व पुरोगामी विचार असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय विषमता दूर करण्यासाठी संघटनाला महत्त्व दिले पूर्वी भारत देश असंख्य जाती जमाती आणि लहान लहान राज्यांमध्ये विभागलेला होता. त्याला संघटित करून राष्ट्र बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये डॉ. आंबेडकरांचे कार्य मोलाचे आहे भारत देशाचा राष्ट्रनिर्मितीचा प्रवास म्हणजेच डॉ.आंबेडकरांनी लिहिलेली भारताची राज्यघटना त्यामुळेच भारतात लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्राची उभारणी झाली. समतेवर आधारित समाजरचना असावी यासाठी त्यांनी समाजकारण व राजकारण याबरोबरच अर्थकारणानावरही विवेकनिष्ठ लेखन केल्याचे दिसून येते.

**अभ्यास विषयाचे महत्त्व -**

मराठी साहित्यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या जातिभेद, धर्मभेद, स्त्रीविषयक कार्य, राजकीय विचार, पत्रकारिता या घटकांचा विविधअंगी विचार झाला असला तरी त्यांच्या अर्थनितीचा विचार सर्वांगीण झालेला दिसून येत नाही. त्यांच्या अर्थविषयक विचारांना अर्थशास्त्रामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. न्याय व समताधारीत विवेकनिष्ठ पुरोगामी विचारवंत म्हणून डॉ. आंबेडकरांची अर्थनिती जागतिक पातळीवर प्रेरक ठरली आहे. संशोधन विषयाच्या अनुषंगाने याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अर्थनिती अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**उद्देश-**

१)भारतीय अर्थव्यवस्थेमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थविषयक विचारांचे महत्त्व स्पष्ट करणे

२)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले भारतीय अर्थव्यवस्थेमधील कृषी क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित करने

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेले मुख्य उद्योगांचे राष्ट्रीयीकरण हे धोरण स्पष्ट करने

४) कामगारांचे आर्थिक कल्याण विषयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत लक्षात घेणे

**गृहितके -**

१) भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान मोलाचे आहे

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थविषयक धोरण आजही देशाला प्रेरणादायी आहे

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुलभुत किंवा मुख्य उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याला महत्त्व दिले.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांचे आर्थिक कल्याण व्हावे यासाठी कामगार कायदे बनवण्यात महत्वपूर्ण योगदान दिले

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आर्थनिती-**

१९४७ च्या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय घटनांमध्ये व्यस्त होते. त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्र सोडून फक्त अर्थकारणावर भर दिला असता तर ते मोठे अर्थतज्ञ म्हणून जगापुढे आले असते असे मत प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्रीनिवास अंबीराजन यांनी व्यक्त केले आहे बहुजन समाज सामाजिक, राजकीय दृष्टिकोनातून डावलला गेलेला आहे तसा तो आर्थिक दृष्टिकोनातून सुद्धा पिचलेला आहे याची कल्पना डॉ आंबेडकर यांना होती. या बहुजन समाजाला दुय्यम वागणुकीबरोबर रोजच्या जगण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी आर्थिक प्रश्नाशी झगडा द्यावा लागत होता. डॉ. आंबेडकरांनी या प्रश्नाचा विवेकनिष्ठ अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. १९४७ मध्ये त्यांनी संविधान सभेपुढे 'प्रांत आणि अल्पसंख्यांक' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना आर्थिक प्रश्न व राजकीय समाजवाद मांडण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्या विचारांची फारशी दखल घेतली गेली नाही आर्थिक शोषण संपवायचे असेल तर मूलभूत उद्योगांचीमालकी आणि व्यवस्थापन राज्याच्या हातात राहिले पाहिजे आणि विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे अशी सूचना डॉ.आंबेडकरांनी आपल्या निवेदनात केली होती.

डॉ.आंबेडकर हे महान अर्थतज्ञ होते. त्यांची अर्थविषयक अभ्यासामध्ये परिपक्वता होता. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी अर्थशास्त्रावर अनेक पुस्तके लिहून आपले आर्थिक विचार सर्वसमावेशकपणे मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या आर्थिक हक्कांबाबतच्या विचारांना मूलभूत हक्कांच्या प्रकरणात योग्य तो न्याय मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या बहुतेक सूचना राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वांवरील एका वेगळ्या प्रकरणात समाविष्ट केल्या होत्या. आज आपण २१ व्या शतकातील आर्थिक विसंगती, जागतिक अर्थव्यवस्था, उदारीकरण, माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट, त्याचे दूरगामी परिणाम प्रत्यक्ष पाहतो आहोत. या संक्रमण काळातही डॉ. आंबेडकरांचे विचार प्रासंगिक आहेत ते काळाच्या प्रवाहात आजही प्रेरणा देणारे आहेत. कारण त्यांची विचारसरणी त्याच्या काळाच्या शतकाच्या पुढे होती. असे असले तरी उच्चवर्णीयांचा अस्पृश्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि सोव्हिएत रशियाच्या आक्रमक समाजवादामध्ये डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारसरणीला योग्य ते स्थान मिळाल्याचे दिसत नाही. डॉ. आंबेडकरांनी शहरे आणि खेडे यांच्यातील आर्थिक आणि सामाजिक विषमता सखोलपणे तपासली होती. शहर आणि गाव यांमधील वाढत्या अंतराची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यांना आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट करायची होती. म्हणूनच त्यांनी सामूहिक शेती आणि समाजवादाचे समर्थन केले. जगाचा इतिहास, तत्त्वज्ञान, धर्म आणि आर्थिक समीकरण यांचा सखोल अभ्यास

केल्यानंतर त्यांच्या लक्षात येते की, सरंजामदार आणि जमीनदार यांनी जातिव्यवस्था मजबूत केली आहे व त्यामुळे समाजामध्ये शोषण, सक्तीचे श्रम आणि विषमता वाढली आहे.

**भारतीय अर्थव्यवस्था, शेती आणि शेतकरी -**

कृषी व्यवस्थेवर आधारित असलेली भारतीय अर्थव्यवस्था सुधारायची असेल तर शेती व शेतीला पूरक असलेले उद्योगधंदे याला महत्त्व दिले पाहिजे असे डॉ.आंबेडकरांचे मत होते. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून शेती व शेतकऱ्यांच्या हितास प्राधान्य देणारा जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो जाहीरनामा आजही आदर्श घ्यावा असा आहे. शेतक..ची दयनीय अवस्था लक्षात आल्यानंतर डॉ. आंबेडकर त्यांना पुढील मार्ग सुचवितात 'He then suggested that his people should migrate to some better and distant lands, if they wished to be relieved of the oppression at the hands of caste Hindus and Hindu landlords.'[1] शेतकरी व त्यांची आर्थिक समस्या या विषयावर त्यांनी १९१८ मध्ये 'जर्नल ऑफ द इंडियन इकॉनॉमिक्स सोसायटी' मधून' भारतातील शेतजमीन आणि त्यावरील उपाय' नावाचा शोध निबंध सादर केला होता. भारतीय शेतकरी व शेतीची दुरावस्था लक्षात घेऊन त्यांनी तुकड्या तुकड्यांनी शेती करण्यापेक्षा सामूहिक शेती करावी व शेतीला जोडधंद्याची सा असावी असे दोन मार्ग सुचविले होते. शेती, शेतकरी व भारताची अर्थव्यवस्था याविषयी डॉ. आंबेडकरांनी कृतिशील विचार मांडले व तसे कार्य केले. शेतीसाठी लागणाऱ्या जलसिंचनाचे महत्त्व ओळखून त्यांनी१९४२ ते ४६ या काळात श्रममंत्री पदावर असताना दामोदर खोरे, सोननदी खोरे, हिराकुंड प्रकल्प यासारख्या जलसिंचनाच्या योजना पूर्णत्वास नेल्या

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नैतिक दृष्टिकोनातून आर्थिक विषमतेचा विचार करतात त्यांनी व्यापार, शेती, गरीब, श्रीमंत, श्रमिक, जागतिक अर्थव्यवस्था अशा विविध पैलूंचा विचार करून 'ईस्ट इंडिया कंपनीचे भारतातील प्रशासन आणि अर्थकारण', 'ब्रिटिश भारतातील प्रांतीय आर्थिक उत्क्रांती' आणि 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी: इट्स ओरीजीन अँड इट्स सल्यूशन' या पुस्तकांमधून आपले अर्थविषयक विचार स्पष्ट केल्याचे दिसून येते. आर्थिक घटकांचा विचार करताना त्यांनी सामाजिक घटकांचाही सारासार विचार केल्याचे दिसून येते. त्यांच्या मते आर्थिक असमानता दूर करायची असेल तर तसे रोजगार निर्माण होणे आवश्यक आहे समाजकारणाबरोबरच त्यांनी अर्थकारणामध्ये ही स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा पुरस्कार केला होता त्यांच्या मते, सामाजिक संघटन न होण्याला जात, धर्म, गरीब, श्रीमंत असे विविध घटक जसे जबाबदार आहेत त्याच पद्धतीने आर्थिक असमानतेमध्ये या घटकांबरोबरच व्यक्तिगत लाभ हा घटक सुद्धा कारणीभूत आहे राजेन्द्र कुमार आर्या आणि टोपेन चौरे 'डॉ. भीमराव आंबेडकर यांचे कृषी क्षेत्रासंदर्भातील आर्थिक विचार' मध्ये म्हणतात, "Dr. Bhimrao Ambedkar was a strong advocate of land reforms and of a prominent role for the state in economic development. He recognised the inequities in an unfettered capitalist economy. Dr. Ambedkar views land holding and land revenue system and agricultural sector holding and land revenue system and agricultural sector to present time."[2] डॉ.आंबेडकर व्यक्तीला उत्तम आयुष्य जगता यावे यासाठी त्याने आधुनिकीकरणाच्या आधारे आर्थिक लाभ करून घेता यावा म्हणून पारंपरिक अर्थव्यवस्थेपेक्षा आधुनिक अर्थव्यवस्थेला महत्त्व देतात. अर्थव्यवस्था निरंकुश असावी हा विचार मांडत असताना त्यांनी राज्य किंवा वैयक्तिक संस्थानांनाच अर्थविषयक अधिकार देण्यापेक्षा राज्य व संस्थाने या दोघांनाही आर्थिक घटकांचा समान अधिकार असावा असे मत मांडले. जीवन विमाचे राष्ट्रीयकरण व्हावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणजेच राष्ट्राच्या उत्पन्नाचा ठराविक हिस्सा शेती व उद्योग यांच्या सक्षमीकरणासाठी खर्च करावा अशी आधुनिक विचारसरणी मांडून त्यांनी एकाच वेळीविमा, शेती व उद्योग या तिन्ही घटकांचे भारतीय अर्थव्यवस्थेमधील महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला.

**मुलभुत किंवा मुख्य उद्योगांचे राष्ट्रीयीकरण**

१९१८ मध्ये प्रकाशित झालेल्या 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमेडीज' या लेखात डॉ.आंबेडकरांनी भारतातील कृषी समस्यांवर सर्वोत्तम उपाय म्हणून औद्योगिकीकरणाची शिफारस केली. त्यांच्या मते, आर्थिक नियोजनासाठी लोकसंख्येचा कमी होणारा दबाव आणि भांडवली वस्तूंचे वाढते प्रमाण यामुळे जमीन होल्डिंग्सचा आकार वाढवण्याची गरज निर्माण होईल म्हणून औद्योगिकीकरण हा त्यावरील एक नैसर्गिक उपाय आहे. **डांगळे अर्जुन, 'आंबेडकरी चळवळीचे अंतरंग' या ग्रंथामध्ये म्हणतात, 'आपल्या देशाने जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था आणि खाजगीकरण या मूल्यांचा स्वीकार केला असून आर्थिक सामाजिक क्षेत्रात यामुळे लक्षणीय बदल होणार आहेत. त्या अनुषंगाने आंबेडकरवादाचीमांडणी होणे आवश्यक आहे.'**[३] डॉ.आंबेडकरांना सर्व प्रकारच्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण अपेक्षित नव्हते परंतु जे उद्योग मुख्य आहेत किंवा जे मुख्य उद्योग म्हणून घोषित केले आहेत ते राज्याने चालवले पाहिजेत व जे उद्योग मुख्य उद्योग नसून मूलभूत उद्योग आहेत तेही राज्य किंवा त्या महामंडळांनी चालवावेत अशी सूचनाही त्यांनी केली. डॉ.आंबेडकरांनी राष्ट्रीयीकरणाच्या प्रक्रियेला शोषित वर्गाच्या हिताशी जोडले होते. मुलभूत उद्योगांव्यतिरिक्त उत्पादनाची काही क्षेत्रे खाजगी कंपन्यांच्या हाती द्यावीत असे त्यांचे मत होते.पण खाजगी कंपन्यांना समाजाचे व्यापक हित लक्षात ठेवावे लागेल. राज्यात कोणते उद्योग चालवायचे आणि कोणते उद्योग खाजगी क्षेत्रात ठेवायचे हे सरकारला ठरवावे लागेल.

आभ्यासाअंती डॉ. आंबेडकरांच्या लक्षात आले की खाजगी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचे झपाट्याने औद्योगिकीकरण करू शकत नाही कारण त्यांचे मुख्य उद्दिष्ट जास्तीत जास्त नफा मिळवणे आहे आणि त्यांचे स्वतःचे हित प्रथम आहे भारतीय खेड्यांची

अर्थव्यवस्था गरीब लोकांना मदत करत नाही आणि भांडवलदार, जमीनदार आणि सावकार त्यांच्या मागासलेपणाचा फायदा घेते. खाजगी क्षेत्राने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न केल्यास आर्थिक विषमता निर्माण होऊन कामगारांचे शोषण वाढेल. खाजगी क्षेत्राच्या स्वार्थी आणि नफेखोर प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवता यावे आणि बड्या औद्योगिक घराण्यांची मक्तेदारी मोडीत काढता यावी म्हणून उद्योगांचे अंशतः राष्ट्रीयीकरण व्हावे ही डॉ. आंबेडकरांची कल्पना होती. त्यांच्या मते, मूलभूत उद्योग म्हणून घोषित केलेले उद्योग राज्याच्या मालकीचे आणि राज्याद्वारे चालवले जाणे आवश्यक आहे. जोपर्यंत उद्योगांना भांडवल उपलब्ध होत नाही तोपर्यंत त्यांच्याकडून चांगल्या परिणामांची अपेक्षा करता येत नाही. उद्योगांसाठी आवश्यक भांडवल उपलब्ध करून देण्याची जबाबदारी त्यांनी संपूर्णपणे राज्यावर टाकली

**कामगारांचे आर्थिक हित-**

डॉ. आंबेडकर अस्पृश्यांचे पूर्ण नेते होते आणि त्यांच्याशी संबंधित प्रश्नांच्या बाजूने होते.मात्र गरिबांची स्थिती सुधारण्याची एकही संधी त्यांनी सोडली नाही. कामगारांच्या हक्कासाठीही ते लढत राहिले. मुंबई विधानसभेचे सदस्य या नात्याने त्यांनी कामगारांच्या समस्यांमध्ये खूप रस घेतला आणि व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे कामगार सदस्य असताना भारतात कामगार कायदे बनवण्यात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. मुंबईतील एच. एम. आय. डॉकयार्डमधील अस्पृश्य कामगारांमार्फत २७ मे १९४७ रोजी सायंकाळी ६ वाजता सिद्धार्थ कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १००१ रुपयांची थैली अर्पण करण्याच्या समारंभ होता. त्या समारंभामध्ये कामगारांना उद्देशून बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'देशामधील परिस्थितीकडे लक्ष देऊन अस्पृश्य कामगारांनी अस्पृश्य कामगार हितवर्धक संघाची संघटना अधिक बळकट केली पाहिजे. कॉंग्रेस, कम्युनिस्ट वगैरे कोणाच्याही थापेबाजीस बळी न पडता गोदीमधील अस्पृश्य कामगार संघाच्या प्रमुख लोकांच्या मार्गदर्शनाखालीच तुमचा लढा यशस्वी करा.'[४] १९२८ मध्ये कापड कामगारांचा संप झाला. त्यावेळी डॉ.आंबेडकरांचे असे मत होते की कम्युनिस्ट आणि संप हे अतूट असे दुहेरी नाते आहे.त्यावेळी कामगार चळवळीत एक नवा दृष्टिकोन विकसित होत होता. परंतु त्यावेळची परिस्थिती पाहता डॉ. आंबेडकरांचे असे मत होते की त्यावेळच्या कामगार चळवळीने कामगारांचे आर्थिक कल्याण यापेक्षा राजकीय क्रांतीला महत्त्व दिले. डॉ.आंबेडकरांनी कष्टकरी, मजूर, शेतकरी यांना आर्थिक, सामाजिक न्याय मिळावा, यांच्या हिताचे रक्षण व्हावे यासाठी १५ ऑगस्ट १९३६ मध्ये दादासाहेब गायकवाड , डी. व्ही. प्रधान, चित्रे, टिपणीस यांच्या सहकार्याने स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली मात्र लोकांच्या मानत जातीय भेदभाव असल्याने सर्व लोक एकत्र आले नाहीत परिणामी या पक्षाचे कार्य लोकांपर्यंत पोहचले नाही.

**समारोप –**

शेतकरी स्वतःसाठी शेती करत होता मात्र डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नाने शेतीला व्यवसायाचे स्वरूप आल्यानंतर शेतकऱ्यांनी व्यवसायाधारित शेती करण्यास सुरुवात केली कापूस, गहू, अफूच्या बिया, तांदूळ, चहा, कॉफी हे घटक फक्त देशांतर्गत न राहता त्याला जागतिक बाजारपेठेत स्थान मिळाले. डॉ. आंबेडकरांनी 'रुपयाचा प्रश्न' या ग्रंथामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचे सूक्ष्म निरिक्षण नोंदविले आहे. १९२० मध्ये रुपयाचे मूल्य जास्तच घसरत गेले. त्याची क्रयशक्ती कमी झाली. उत्पादन कमी झाल्यामुळे महागाईत वाढ झाली. अशा विविध समस्यांमधून भारत देश पुढे जात होता तेव्हापासून आजपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थविषयक विचार भारत देशाला प्रेरणादायी असे आहेत.

**निष्कर्ष –**

१)अभ्यासाअंती असे लक्षात येते की, आर्थिक बाबतीत राष्ट्र सक्षम होण्यासाठी प्रामुख्याने कृषी क्षेत्राला महत्त्व दिले पाहिजे.

२) डॉ. आंबेडकरांनी सुचविलेल्या पद्धतीने मुख्य उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केल्यास भारतीय समाजातील गरीब आणि दुर्बल घटकांच्या हिताचे रक्षण होईल.

३)भारतातील औद्योगिकीकरण आणि कृषी संरचनेची पुनर्बांधणी केली तर कामगारांबरोबर राष्ट्रीय अर्थव्यवस्था सदृढ होण्यास मदत होइल.

**संदर्भ –**

१)Dhananjay Keer, 'Dr. Ambedkar life and mission', Publication, Popular Publication, Bombay, 1954, Page No.128

२)Rajendra Kumar Arya and Topan Choure , 'The Economic thought of Dr. Bhimrao Ambedkar with respect of agriculture sector', Developing Country Studies, Vol. 4, No. 25, 2014, Page No. 85

३)डांगळे अर्जुन, 'आंबेडकरी चळवळीचे अंतरंग', लोकवडमय गृह, मुंबई, ऑक्टोंबर २००७, पा. नं. १३३

४) संपा. वसंत मून, हरी नरके, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे', खंड १८, भाग ३, १९४६ ते १९५६., डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २०१६, पा. नं. ७१